गोदातीर 23/03/2025

# सोशल मीडियावर दोन समाजात तेढ निर्माण होईल अशी पोस्ट व्हायरल करू नये

## नांदेडकरांना पोलीस दलाकडून आवाहन



**नांदेड (प्रतिनिधी)-** आपण कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, तसेच खोट्या अफवा पसरवू नये, सोशल मीडियावर दोन समाजात तेढ निर्माण होईल किंवा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल अशी पोस्ट करू नये, असे आवाहन नांदेड जिल्ह्यातील नागरिकांना नांदेड पोलीस दलाकडून करण्यात आले आहे.

त्या अनुषंगाने सोशल मीडिया मॉनिटरिंग दरम्यान सायबर पोलीस स्टेशनकडून जानेवारी २०२५ ते अद्यापपावेतो १२५ इंस्टाग्राम अकाऊंटची पूर्ण माहिती काढून संबंधित पोलीस स्टेशन यांना त्यावर कारवाई करण्यासाठी पाठविण्यात आलेली आहे आणि त्यावर कारवाई करण्याची प्रक्रिया सुरू आहे. पाठविण्यात आलेल्या माहितीवरून आतापर्यंत भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ कलम १६८ नुसार तीन कारवाया करण्यात आल्या आहेत. नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशन गु.र.नं. २२१/२०२५, २२२/२०२५, २२३/२०२५ कलम ४/२५ भारतीय हत्यार कायदा प्रमाणे व इतवारा पोलीस स्टेशन ३९/२०२५ कलम १२२ लोकप्रतिनिधी अधिनियम ाप्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच दोन समाजात तेढ निर्माण होईल, असा मजकूर सोशल मीडियावर प्रसारीत केल्याने पो. स्टे. कंधार गु. र. क्र. ७२/२०२५ कलम ३५३(२) भारतीय न्याय संहिता व तामसा गु. र. क्र. ५३/२०२५, ५४/२०२५, कलम ३५३ (२) भारतीय न्यायसंहिता कायद्याप्रमाणे असे एकूण ७ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. समाजामध्ये दहशत पसरविणारे व्हिडीओ तसेच आक्षेपार्ह पोस्ट डिलीट करण्यात आल्या आहेत. आक्षेपार्ह पोस्ट अपलोड करणाऱ्या इसमांवरती योग्य ती प्रतिबंधात्मक / कायदेशीर कार्यवाही करण्यात येत आहे.

नांदेड जिल्हा पोलीस दलाचे सर्व बाबींवर बारकाईने लक्ष असून कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलिसांना सहकार्य करावे. जिल्ह्यातील शांतता अबाधित ठेवणे ही आपली सर्वांची जबाबदारी आहे. काही सामाजिक, धार्मिक बाब निदर्शणास आल्यास नजीकच्या पोलीस स्टेशनला संपर्क करावा. उपरोक्त गुन्हयात काही विधीसंघर्ष बालकांचा समावेश असल्याने पालकांने त्यांचे मुलांचे सोशल मीडियावर लक्ष ठेवून दोन समाजात तेढ निर्माण होणारे स्टेटस/वक्तव्य सोशल मीडियावर प्रसारीत करणार नाहीत, याची दक्षता घ्यावी असे आवाहन पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी आवाहन केले आहे.